| अ. क्र. | लक्षवेधी | विभागाचे नाव |
|---|---|---|
| १ | "मुंबई विद्यापीठाच्या ऑनलाईन मूल्यांकनामुळे अनेक पदविकांचे निकाल रखडले होते त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया गेले असणे, तसेच अनेक विद्यार्थांच्या उत्तरपत्रिका व पुरवण्या गहाळ झाल्याचेही निदर्शनास आले असणे, त्यामुळे पुनर्मुल्यांकना मध्ये देखील विद्यार्थ्यांवर अन्याय झाला असणे, उत्तरपत्रिका मूल्यांकनासाठी विद्यापीठामार्फत नेमलेल्या कंत्राटदार कंपनी सक्षम नसल्यामुळे उत्तरपत्रिका मुल्यांकन प्रक्रियेसाठी उशीर झाला असणे, व त्यामुळे मोठ्या प्रमाणात गोंधळ झाला असणे, असा आरोप विद्यापीठा कडून कंपनीवर करण्यात आला असणे, परंतु मुल्यांकना करिता नेमलेल्या मेरीट ट्रॅक कंपनीकडून विद्यापीठाने मनुष्य बळ पुरवले नसून तसेच संवादाच्या अभावामुळे निकालाचा अभूतपूर्व गोंधळ झाला असल्याचे विद्यापीठावर आरोप केला असणे, त्यामुळे एकीकडे विद्यार्थ्यांचे वर्ष वाया गेले असताना विद्यापीठ व कंपनी परस्पर विरोधी आरोप करत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे संपूर्ण प्रक्रियेची सखोल चौकशी करून दोषी कंपनी अथवा विद्यापीठ प्रशासन यांच्यावर कडक कारवाई होण्याची गरज असणे, तसेच भविष्यात असा अभूतपूर्व गोंधळ होऊ नये याकरिता प्रशासनाने योग्य त्या उपाययोजना करण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | **उच्च व तंत्र शिक्षण विभाग** |

| | | |
|---|---|---|
| 2 | "यवतमाळ जिल्ह्यामध्ये अतिविषारी कीटकनाशकाच्या फवारणीमुळे अनेक अल्पभूधारक शेतकऱ्यांचा मृत्यू व ७५० जणांना विषबाधा झाल्याचे माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये निदर्शनास येणे, तसेच, कीटकनाशकाच्या फवारणीमध्ये शेतकऱ्यांचा मृत्यू व विषबाधा होण्याची काय कारणे आहेत याबाबत उच्च स्तरीय चौकशी करण्याची गरज असणे, तसेच, जगभरातून बंदी घातलेले कीटकनाशक राज्यामध्ये अनेक ठिकाणी खुलेआम विक्री केले जात असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे, प्रशासनातील काही अधिकाऱ्यांकडून बंदी घातलेल्या कीटकनाशकांच्या विक्रीवर निर्बंध आणण्याऐवजी त्याचे मार्केटिंग केले जात असल्याचे आरोपही झालेले असणे, तसेच, चौकशीतून दोषी अधिकारी व कंपन्या समोर आल्यास त्यांच्यावर काय कारवाई करणार असणे, तसेच, राज्य सरकारच्या पातळीवर जेनेरिक कीटकनाशक बनविण्याच्या दृष्टीने विचार चालू असल्याचे ही निदर्शनास येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | **कृषि विभाग** |
| **3** | "सांगली शहर पोलीस ठाण्यामध्ये लुटमार प्रकरणात पोलीस कोठडीत असलेल्या संशयित अनिकेत कोथळे याचा पोलिसांनी वापरलेल्या थर्ड डिग्रीमुळे मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले असणे, तसेच, सदरचे पोलिसांनी केलेले खून प्रकरण दडपण्यासाठी मृत्यू देह आंबोली च्या घाटामध्ये नेऊन जाळून फेकल्याचे ही निदर्शनास येणे, तसेच, अनिकेत कोथळे यांना अश्लील चित्रीकरण | **गृह विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | व अश्लील सीडी व्यवसायाबाबत माहिती मिळाल्यामुळे त्याची सुपारी देऊन पोलीसामार्फत खून केला असल्याचे ही आरोप होत असणे, तसेच, पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही फुटेज दोषी पोलीस अधिकाऱ्याच्या सांगण्यावरून नष्ट केल्याचे निदर्शनास येणे, तसेच, पोलीस कोठडी मध्ये पोलिसांच्या मारहाणी मध्ये आरोपीचा मृत्यू होण्याचे राज्यामध्ये प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे, पोलीस दलाची प्रतिमा मलीन झाली असणे, त्यामुळे, सदर प्रकरणी मृत्युमुखी पडलेल्या कोथळेच्या कुटुंबियांना योग्य न्याय मिळण्याकरिता दोषींवर कडक कारवाई होण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | |
| **4** | "राज्यात मोठया प्रमाणात कपासीचे बोगस बियाणांची विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात येणे, या बोगस बियाणामूळे बोंड अळीच्या प्रादुर्भावाने विदर्भासह राज्यातील ४० लाख हेक्टरवरील कापासाच्या पीकाला बसलेला फटका बसणे, त्यामुळे विदर्भासह मराठवाडातील शेतकऱ्यांचे करोडो रुपयांचे नुकसान होणे, बीटी कॉटन बियाणास बोंड अळी प्रतिसाद देत नसल्याबाबतचा अहवाल नागपूरच्या केंद्रीय कापूस संशोधन संस्थेने डिसेंबर, २०१५ मध्ये शासनास अहवाल दिलेला असतांना सुध्दा या अहवालाकडे शासनाने दुर्लक्ष केल्यामूळेच कृषी अधिकाऱ्यांच्या आर्शिवादाने बंदी असलेले आणि बोगस बियांणाची कृषी केंद्राच्या माध्यमातून मोठया | **कृषि विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | प्रमाणात विदर्भासह राज्यात विक्री करण्यात येणे, बोंड अळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शेतकऱ्यांनी केलेल्या औषध फवारणीमुळे यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, बुलडाणा, नागपूर, वर्धा, अकोला, अमरावती, भंडारा या जिल्हयासह राज्यात ५० पेक्षा अधिक शेतकरी व शेतमजूरांचा विष बाधेमुळे मृत्यू होणे, तर या विष बाधेमूळे गंभीर आजारी पडलेल्या ४५० च्या वर शेतकरी व शेतमजूरां दवाखान्यात भरती करण्यात येणे, बोंड अळीचे हे संकट मागील दोन वर्षापासून कायम असताना आणि विष बाधा होत असतांना सुध्दा शासनाने त्याची दखल न घेणे, कापसाचे सदोष बियाणे विकले गेल्याने शेतकऱ्यांवर नगदी पीक गमवण्याची पाळी येणे, विदर्भातील आत्महत्याग्रस्त जिल्हयातच याचा मोठया प्रमाणात फटका बसणे, अगोदरच कर्जाच्या खाईत अडकलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा लाखो रूपयांचा आर्थीक फटका सहण करावा लागण्याने त्यांचे कुटूंब उघडयावर पडणे, त्यामूळे शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करुन प्रति हेक्टरी ५० हजार रूपये नुकसानभरपाई देण्याची मागणी करण्यात येणे, शेतकऱ्यांचे जीवण उध्वस्त करणाऱ्या या कंपन्याच्या विरोधात अद्यापही कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसल्यामूळे आणि शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेल्या नुकसान भरपाईबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यामूळे शेतकऱ्यांत पसरलेले तिव्र असंतोष, चिडीची भावना व संतापाचे वातावरण परिणामी याबाबत राज्य शासनाने तातडीने | |

| | | |
|---|---|---|
| | करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | |
| **5** | "मुंबई शहरामध्ये व उपनगरात मोठया प्रमाणात रेल्वे स्टेशनाच्या दोन्ही बाजूस तसेच पदपथावर अनधिकृतपणे फेरीवाले बसलेले असणे, शाळा, महाविद्यालये, प्रार्थना स्थळे याठिकाणी सुध्दा अनधिकृत फेरीवाले बसल्यामुळे पादचा-यांना ये-जा करण्यास खूप मोठया प्रमाणात त्रास सहन करावा लागत असणे, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करुन काही फेरीवाले रस्त्याच्या बाजूला किंवा पदपथावरच सर्रासपणे खाद्यपदार्थ उघडयावरच अनधिकृतपणे सिंलेडरचा वापर करुन बनवित असणे, पदपथावर खाद्यपदार्थ बनवित असल्यामुळे सिंलेडरचा स्फोट होउन अपघात होण्याची संभावना मोठया प्रमाणात असणे, तसेच पदपथावरुन किंवा रस्त्यावरुन चालणा-या सर्वसामान्य नागरीकांच्या जीवीताला मोठया प्रमाणात धोका निर्माण होवू शकतो, यामुळे सर्वसामान्य नागरीकांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, मुंबई शहरामध्ये शहर विक्री धोरणानुसार (Town Vending Policy) फेरीवाला क्षेत्र तसेच न-फेरीवाला क्षेत्राची निर्मिती करणे तसेच रहिवासी क्षेत्रामध्ये न-फेरीवाला क्षेत्र करणे, फेरीवाला क्षेत्रामध्ये परवाना धारक फेरीवाल्यानांच धंदा करण्याचा नियम करणे, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | **नगर विकास विभाग** |

| अ. क्र. | लक्षवेधी | विभागाचे नाव |
|---|---|---|
| **6.** | "प्रत्येक गांव व पाड्यातील प्रत्येक घरामध्ये सौभाग्य अलंकार या नावाने पंतप्रधानांनी विद्युत पुरवठा करण्याची घोषणा केली असली तरी राज्यात 111 गावांमध्ये वीज पोहचली नाही, हे कटु सत्य असणे, केंद्रसरकारने कोळशाची निर्माण केलेली कृत्रिम टंचाई, गेल्या काही महिन्यांपासून राज्याला कोल इंडिया कंपनीकडून पुरेसा कोळसा उपलब्ध होत नसल्यामुळे महानिर्मितीच्या प्रकल्पांना मोठा फटका बसल्याने महानिर्मिती कडुन साधारणपणे साडेसहा हजार मेगावॅट वीज उपलब्ध होणे अपेक्षित असता त्यात दोन हजार मेगावॅटहून अधिक घट झाल्याने महावितरण कंपनीला महानिर्मिती, अदानी कंपनी, रतन इंडिया, केंद्रीय प्रकल्पाकडून जलविद्यूत प्रकल्प, उरण प्रकल्प व सीपीजीएल आदि विविध कंपन्यांकडुन वीज घ्यावी लागणे, परळी औष्णीक विद्युत केंद्रातून 100 पेक्षा अधिक मेगावॅट वीज निर्मितीची क्षमता असतानाही आजघडीला केवळ 325 मेगावॅट वीजनिर्मिती सुरु असणे, तेथील केंद्रात आठ संचांपैकी 5 संच पूर्णपणे बंद असणे, त्यातील संच क्रमांत 3 अवसायनात काढणे, परिणामी संच क्र. 3,4 व 5 मधून प्रत्येकी 210 मेगावॅट वीज निर्मिती होणे तर संच क्र. 6 व 7 मधून प्रत्येकी 250 मेगावॅट निर्मिती होणे तर संच क्र. 8 नवीन असुनही तो वारंवार बदं पडत असणे आदि कारणांमुळे राज्याला पुन्हा एकदा भार नियमनाला सामोरे जाण्याची निर्माण झालेली शक्यता, मुंबईतील मुलुंड, भांडुप, कल्याण, नाशिक, नागपूर या शहरांमध्ये ऑक्टोबर 2017 पासूनच लोडशेडिंग सुरु झालेले असणे, पनवेलचा शहरी भाग, कळवा, दिवा, मुंब्रा व कल्याण या भागात सुरु असलेले लोडशेडिंग विचारात घेता शाळांच्या सहामाही परिक्षा सुरु होत असतानाच लोडशेडिंगचे उभे ठाकलेले संकट, अनेक भागात वीज पुरवठा खंडित होणार याची अधिकृत माहितीच ग्राहकांना उपलब्ध करुन दिली जात नसल्याने तसेच वीजेवर अवलंबून असलेली कामे रखडत असल्याने लोकांमध्ये तीव्र असंतोष व | **उदयोग, उर्जा व कामगार (उदयोग) विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | प्रचंड संताप पसरला असल्याने या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | |
| **7.** | "उडीद व मुगाच्या विक्रीसाठी सुरु असलेली ऑनलाईन नोंदणी, याबाबत खरेदी केंद्रावरुन शेतकऱ्यांना संदेशही पाठविले जाणे, त्यामूळे सोयाबीनचा कुठेही उल्लेखच नसल्यामूळे सोयाबीनची हमीभावाने विक्री करण्यासाठी कुठेही ऑनलाईन नोंदणी होत नसणे, त्यामूळे शेतकऱ्यांना सोयाबीनची विक्री बाजारपेठेत नेवून हमी भावापेक्षा १००० ते १५०० रुपये कमी दराने विक्री करावी लागणे, हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी केली जावू नये, यासाठी शासकीय यंत्रणेने व्यापाऱ्यांना दिलेला इशारा, त्याला व्यापाऱ्यांनी प्रतिसाद न देता हमीभावाप्रमाणे भाव देणे परवडत नाही असे कारण दाखवून व्यापाऱ्यांनी सोयाबीनची खरेदी बंद करणे, विदर्भासह मराठवाड्यातील जिल्ह्यामध्ये ऑनलाईन नोंदणीसाठी कोणीही सहभागी न होणे, परिणामी अधिकृत खरेदी केंद्रावर सोयाबीनची खरेदी न होणे, न परवडणाऱ्या ३ हजार ५० रुपये इतकाही हमीभाव मिळत नसल्यामूळे दि.२३ ऑक्टोबर, २०१७ रोजी नेर (जिल्हा यवतमाळ) बाजार समितीसमोर तसेच अमरावती-यवतमाळ मार्गावर शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणात रस्ता रोको आंदोलन करणे, सोयाबीन खरेदी केंद्रावर आणताना सोयाबीन नोंद असलेला सात-बारा, एकरी आठ क्विंटल सोयाबीन, आधारकार्ड, पासबुक इत्यादी बाबी बंधनकारक करणे, नाफेडच्या ग्रेडरकडून, सोयाबीनची कमी ग्रेड दाखवून नाकारण्यात येणारी खरेदी, त्यामूळे शेतकऱ्यांना मातीमोल भावाने सोयाबीन व्यापाऱ्यांना विकावा लागत असंताना सुध्दा याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामूळे शेतकऱ्यांमध्ये पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी सोयाबीनची खेरेदी हमीभावाने करण्याबाबत राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | **सहकार, पणन व वस्त्रोद्योग (पणन) विभाग** |

| | | |
|---|---|---|
| **8.** | "राज्यातील सर्व साखर कारखान्यांना २५५० रुपये एफआरपी देणे बंधनकारक असणे, तथापी सदरहू रु.२५५० या रक्कमेमधूनच तोडणी व वाहतूक खर्च वजा करण्याचे धोरण असणे, त्याच बरोबर उâसाची रिकव्हरी ही ९.५ गृहीत धरुन २५५० हा एफआरपी ठरविण्यात आला असणे, प्रशासनाने मात्र ही रिकव्हरी प्रत्यक्षात किती आहे हे मोजण्यासाठी शासनाची कारखान्यांवर कायदेशीर नजर ठेवणे गरजेचे असणे, कारण रिकव्हरी वाढणे म्हणजे एफआरपी वाढणे असे होय, वरील दोन्ही गोष्टी म्हणजेच तोडणी व वाहतूक खर्च आणि आणि उâसाची रिकव्हरी हे त्या साखर कारखान्यांच्या कक्षेतील विषय केल्यामुळे साखर कारखान्याने याचा गैरफायदा घेऊन शेतक-यांची पिळवणूक करीत असणे, मुद्दामहून रिकव्हरी कमी दाखवणे, तसेच जास्तीचे ताडणी व वाहतूक दाखवून उâस बिलात जास्तीची कपात करणे, हे प्रकार सर्रास होत असल्याचे निदर्शनास येणे, कन्नड-सोयगांव (जि.औरंगाबाद) मतदार संघातील बारामती ॲग्रो या खासगी साखर कारखान्याने केवळ २१०० रुपये प्रती टन उâसाचे भाव जाहिर केलेले असणे, त्यामुळे उâस तोडणी व वाहतूकीचा खर्चही शेतक-यांच्या उâस बिलातून कपात केला असल्याचे निदर्शनास येणे, शासनाच्या या धोरणामुळे शासन शेतक-यांच्या बाजूने आहे की कारखान्यांच्या असा संभ्रम शेतक-यांच्या मनात निर्माण होणे, त्यामुळे हे सर्व प्रकार रोखण्यासाठी शासनस्तरावर तातडीने निर्णय होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | **सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभाग** |
| **9.** | "राज्यात गेल्या वर्षभरात तब्बल 14,368 बालमृत्यू झाले असून यापैकी 3013 बालमृत्यू हे अवघ्या एक महिन्याच्या आतील नवजात बालकांचे झालेले असणे, यात नाशिक जिल्हा रुग्णालयात गेल्या पाच महिन्यात 187 बालमृत्यू झालेले असून ऑगस्ट 2017 मध्ये तब्बल 55 बालकांचे मृत्यू झाल्यानंतरही या मृत्यूंची तूलना गोरखपूरच्या बालमृत्यूकांडाशी करुन नका असे धक्कादायक विधान | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | आरोग्यमंत्री यांनी केल्यामुळे जनतेत निर्माण झालेली कमालीची संतप्त भावना, या जिल्हा रुगणालयात ठाणे, पालघर पासून थेट नंदूरबार येथून आदिवासी भागातील बालके उपचारासाठी येत असतात यातील बहुतेक बालके कमी वजनाची असून रुग्णालयाच्या क्षमतेपेक्षा जास्त बालके येथे कायमच दाखल केली जात असणे, नाशिक जिल्हा रुग्णालयात उपचाराअभावी दरमहा 30 बालकांचे होत असलेले मृत्यू, रुग्णालयाचे प्रश्न सोडविण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी वारंवार मा. आरोग्य मंत्र्यांना पत्र लिहून पाठपूरावा करुनही त्याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबबात आरोग्य यंत्रणा पर्यायाने शासन उदासीन असणे, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया." | |
| **10.** | राज्यात ३२० रक्तपेढ्या असून त्यापैकी २५५ रक्तपेढ्यामधून वाहनातून रक्तपूरवठा करण्यात येणे, तथापि मुंबई, नवी मुंबई, रायगड, ठाणे आदीबरोबरच राज्यातील रक्तपेढ्यांमध्ये रक्ताची टंचाई निर्माण झाल्याचे दि.१५ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, परंतू रक्त तुटवड्याची परिस्थिती ही गेलया वर्षभरापासूनच असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांना खासगी रक्तपेढ्यांमधून जादा दराने रक्त विकत घ्यावे लागणे, त्यातच मुंबई शहर व उपनगरातील शासकीय आणि महापालिकेच्या रक्त पेढ्यांमधील तब्बल १ हजार ९२ युनिटस म्हणजे जवळपास ३८२ लिटर रक्त, रक्तपेढ्यांमधील अपूऱ्या व्यवस्थापनामुळे व नियोजनाअभावी वाया गेल्याचेही तत्पूर्वीच दि.२० सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेले असणे, शहर-उपनगरात केवळ रेकॉर्डच्या नावाखाली रक्तदान शिबिरे आयोजित करणे व या शिबीरांमधील दान केलेल्या रक्ताची वैधता एकदाच संपणे व त्यामुळे बऱ्याचदा हे रक्त वाया जाण्याचे प्रकार घडणे, इतकेच नव्हेतर राजकीय नेते, सामाजिक संस्था वा संघटनांच्या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबीर वा मेळावे | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | आयोजित करणे, परंतू त्याचा तितकासा वापर न झाल्यामुळे हे रक्त वाया जाण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असल्याचेही त्याच सुमारास दृष्टीपतीस येणे, मुंबईतील सेंट जॉर्जेस, नायर, कामा आणि व्ही.एन.देसाई या रक्तपेढ्यांची परवान्यांची वैधता माहे डिसेंबर, २०१७ अखेरीस संपणे तर परवाने नुतनीकरणाच्या प्रक्रियेत असणाऱ्या सर जे.जे.रुग्णालय, वांद्रे भाभा आणि टाटा रुग्णालयांच्या रक्तपेढ्यांचे वेळेत नुतनीकरण न झाल्यास, या रक्तपेढ्यांचा परवाना रद्द होण्याची शक्यता, एकीकडे रक्तपेढ्यांमध्ये रक्त संक्रमण अधिकाऱ्यांची असलेली वानवा तर, दुसरीकडे खासगी रक्तपेढ्यांवर शासनाचे नियंत्रण नसणे, त्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांना जास्त दराने रक्त घ्यावे लागणे, या सर्व बाबींकडे राज्य रक्त संक्रमण समितीचे झालेले दुर्लक्ष, व हतबलता याबाबत शासनाने अधिक चौकशी करुन रक्तपेढ्यांमधील वा आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरांमधील गोळा झालेल्या रक्तसंकलनाबाबत व रकतदर निश्चित करण्याबाबत धोरणात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | |

| अ. क्र. | लक्षवेधी | विभागाचे नाव |
|---|---|---|
| **11.** | "ठाणे-बेलापूर औदयोगिक वसाहतीमधील कारखान्यातून दररोज रसायनमिश्रीत दुषित पाणी रात्रीच्यावेळी परिसरातील कोपरखैरणे, तुर्भे, जुईनगर, नेरूळ नाल्यांमध्ये सोडण्यात येणे, त्यासाठी त्यांनी कारखान्यापासून नाल्यापर्यंत टाकलेल्या पाईप्स, त्यामुळे संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरून तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे, अनेकांना दम लागणे, डोळे चुरचुरणे, घशाचे व त्वचेचे जडलेले विकार, याबाबत नागरिकांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रारी करूनही मंडळाचे त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, रासायनिक दुषित पाण्याबरोबरच कारखान्यातून प्रचंड प्रमाणात धूर सोडण्यात येत असल्याने त्याचाही परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर | **पर्यावरण विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | होत असणे, तसेच घरांच्या छतावर आणि झाडांच्या पानावर कार्बनचे साचलेले थर, रासायनिक मिश्रीत दुषित पाण्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करणे नियमानुसार बंधनकारक असतांना कारखाना व्यवस्थापनाकडून नियमांची होत असलेली पायमल्ली, कारखान्यातून दुषित पाणी सोडण्यात येणाऱ्या नाल्यांची व पावणे येथील ईसीटीपीची स्थानिक लोकप्रतिनिधीनी नोव्हेंबर २०१७ मध्ये केलेली पाहणी, नागरिकांच्या जीवनाशी खेळणाऱ्या कारखान्यांवर कठोर कारवाई करण्याची नागरिकांची होत असलेली मागणी, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. मंत्री महोदयांना दिलेले निवेदन, याबाबत नागरिकांनी तीव्र आंदोलन छेडण्याचा घेतलेला निर्णय, याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका." | |
| **12.** | "जागतीक बाजारात दुधाच्या भुकटीचे दर कोसळणे, गेल्या वर्षिच्या तुलनेत दुधाच्या भुकटीचे दर अध्र्यापर्यंत खाली येणे, तसेच सध्या पुष्ठकाळ असल्याने दुधाचे उत्पादन वाढणे, राज्य शासनाने जाहिर केलेल्या २७ रुपये प्रति लिटर दुधाच्या दरानुसार गाईचे दूध खरेदी करणे सहकारी दूध संघांना शक्य नसणे, आणि कमी दराने दूध विकत घेतल्याबद्दल दुग्धविकास विभागाने कमी दर देणाNया संघावर बरखास्तीच्या कारवाईच्या नोटीसा बजावणे, परिणामी दूध संघामध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, त्यामुळे दूध महासंघाने दि.०१ डिसेंबर, २०१७ पासून गाईच्या दूधाची खरेदी बंद करण्यात येत असल्याचा शासनाला दिलेला इशारा, याप्रकरणी राज्याच्या दुग्धविकास मंत्री यांच्यासमवेत राज्यतील सहकारी दूध संघाच्या प्रतिनिधींच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत त्वरित निर्णय न घेता याबाबत सविस्तर अभ्यास करण्यासाठी पदुम विभागाचे सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून याबाबत अभ्यास करण्याची भूमिका घेतल्याने होणाNया विलंबाबाबत दूध महासंघाने दूध खरेदी बंद आंदोलन मागे घेण्याची शासनाने केलेली विनंती धुडकावून लावणे, त्यामुळे राज्यातील जनतेला गाईचे दूध | **कृषी व पदुम (दुग्धविकास) विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | मिळणार नसल्याने त्यांच्यातही निर्माण झालेली असुरक्षिततेची व असंतोषाची वाढती भावना, याप्रकरणी शासनाने तात्काळ निर्णय घेण्याची आवश्यकता.'' | |
| **13.** | "विदर्भासह राज्यात डेंग्युचा ताप वाढला असून आतापर्यंत विदर्भासह राज्यात डेंग्युचे 3 हजार 500 पेक्षा जास्त रुग्ण आढळून आलेले असणे, त्यापैकी या रोगाची लागन झालेल्या १०० च्यावर नागरिकांचा मृत्यू झाल्याचे माहे नोव्हेंबर 2017 च्यासुमारास निदर्शनास येणे, ऑगस्ट ते ऑक्टोंबर महिन्यात विदर्भात १५०० च्यावर मुंबईत 9431 च्यावर तापामुळे फणफणले असून त्यापैकी २५36 जणांना डेंग्युसदृश्य तापाची लक्षणे आढळून आली असणे, स्वाइन फलुमुळे विदर्भासह राज्यात २५ जणांचा मृत्यू झालेला असणे, ताप, लेप्टो,मलेरिया,स्वाइन फलुमुळे ५० च्यावर जणांना जीव गमवाला लागला असणे, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, नागपूर या जिल्हयासह विदर्भासह राज्यात दरवर्षी पावसाळात विविध साथींचे रोग फैलावत असल्यामूळे अनेकांना आपला जीव गमवावा लागत असणे, परंतू शासनाला या साथीच आजारांना प्रतिबंध व नियंत्रण मिळविण्यात दरवर्षी अपयश येत असणे, राज्यातील शासकीय आरोग्य यंत्रणेवर करोडो रूपये खर्च करण्यात येत असतांना सुध्दा आरोग्य विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असणे, राज्यात डेंग्युच्या तापामुळे वाढत चालेल्या रुग्णांच्या संख्येमुळे नागरिकांत पसरत असलेले भितीचे व चिंतेचे वातावरण आणि तिव्र असंतोष परिणामी विदर्भासह राज्यात होणा-या विविध साथींचे आजारांना प्रतिबंध व नियंत्रण मिळविण्यासाठी कायमस्वरूपी योजना राबविण्यासाठी राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व राज्यशासनाची प्रतिक्रीया." | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण (सार्वजनिक आरोग्य) विभाग** |
| **14.** | "डोंबिवली (जि.ठाणे) येथील एमआयडीसीच्या फेज-२ मधील अॅल्यूफीन कंपनीत झालेल्या एअर कॉम्प्रेसरच्या दि.२० नोव्हेंबर, २०१७ रोजी सकाळ ९ वाजता झालेला शक्तीशाली स्फोट, अपघातातील जखमी कामगाराचा एक पाय पूर्णत: निकामी होणे, कॉम्प्रेसरचा स्फोटाची इतकी दाहकता होती की, | **उद्योग, उर्जा व कामगार (उद्योग) विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | कॉम्प्रेसरचे भाग बाहेर पडून इतस्त: पडणे, एअर कॉम्प्रेसरची हवा पास न झाल्याने हवेचा निर्माण झालेला प्रचंड दाब, त्यामुळे स्फोट झाल्याने पोलीस सूत्रांनी सांगणे, कामगारांकडून कंपनी व्यवस्थापनाला वारंवार देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत सांगण्यात येऊनही कंपनी व्यवस्थापनाने त्याकडे केलेले दुर्लक्ष, परिणामी कारखान्यात झालेला स्फोट, स्फोटाची भिषणता इतकी होती की, तीन ते चार कि.मी. अंतरापर्यंत बसलेले हादरे, कारखान्यातील दोन मशीन ६० फुटावर फेकली जाणे, कानठळ्या बसणाचा आवाजाने घाबरलेले नागरिक सैरावैरा पळत सुटणे, यापूर्वीही १६ मे, २०१६ रोजी डोंबिवलीच्याच प्रोबेस कंपनीमध्ये बॉयलरच्या स्फोटामुळे घडलेली भयंकर दुर्घटना, सदर घटनेत ६ ठार तर, १६० लोक गंभीर जखमी झाले, तर, अनेक इमारतींची झालेले नुकसान, व्यवस्थापनाच्या निष्काळजीपणामुळे कारखान्यामध्ये वारंवार होणारे अपघात, याकडे प्रशासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याप्रकरणी करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | |

| अ. क्र. | लक्षवेधी | विभागाचे नाव |
|---|---|---|
| **15.** | "उन्हाळ्यात जादा तापमान, पावसाची अनियमितता आणि रोगांचा प्रादुर्भाव यात संत्र्याचा आंबिया बहार विदर्भातील शेतकऱ्यांच्या हातातून गेल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास येणे, त्यातच यावर्षी फळगळतीमुळे मोठ्या प्रमाणावर संत्र्याचे उत्पादन घटणे, मूल्यवर्धनाचा आणि प्रक्रियेचा अभाव, दरांमधील घसरण, संशोधनाकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकरी संकटात सापडणे, डिंक्या, कोळशीचा प्रादुर्भाव, नैसर्गिक आपत्तीचा विळखा, घटत चाललेली भूजल पातळी, सिंचनाच्या मर्यादा, प्रक्रिया उद्योगांची वाणवा, निर्णात शुन्य धोरण, सदोष फळपीक विमा अशी अनेक कारणे संत्रा Nहासासाठी जबाबदार असणे, केंद्र शासनाने २००६ मध्ये | **कृषि व पदुम (फलोत्पादन) विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | विदर्भातील संत्रा उत्पादकांसाठी ''टेक्नॉलॉजी मिशन ऑन सिट्रस'' हा उपक्रम सुरु करण्यात येणे, तथापी त्याची प्रभावी अंमलबजावणी न झाल्याने संत्रा उत्पादनास उतरती कळा येणे, सन १९८५ मध्ये नागपूर येथे संत्री संशोधन केंद्राची स्थापना करण्यात येणे, त्यानंतर राष्ट्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन केंद्र म्हणून या संस्थेला बढती देण्यात येणे, फळांची उत्पादकता वाढवणे, नवी रोपे निर्माण करणे, जैवविविधता सांभाळणे, किटक व रोगांच्या प्रादुर्भाव रोखणे ही जबाबदारी या केंद्रावर येणे, तथापी या केंद्राच्या उपयोजितेबद्दल आता प्रश्न चिन्ह उपस्थित केले जात असून या केंद्रात यासंदर्भात संपूर्ण अपयश आल्याचे निदर्शनास येणे, विदर्भातील संत्री प्रक्रिया उद्योगाच्या मर्यादा आता उघड झाल्या असून एकही उद्योग स्थिरस्थावर न होणे, राष्ट्रीय फलोत्पादन अभियानास संत्री उत्पादन वाढीसाठी विविध उपाययोजना राबवूनही राज्यातील संत्री उत्पादनात समाधानकारक वाढ न होणे, संत्र्यासाठी सर्वकष धोरण अद्याप आखले न गेल्याने परिस्थिती हाताबाहेर जाणे, त्यामुळे यासर्व बाबी विचारात घेवून संत्र्यासाठी सर्वकष धोरण आखून प्रभावी उपाययोजना करण्याची आवश्यकता, यासाठी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही, यासंदर्भात शासनाची नेमकी भूमिका व प्रतिक्रिया.'' | |
| **16.** | ''मुंबईतील, गोरेगाव (पूर्व), एस. व्ही. रोड येथील, रॉयल स्मोक या बेकायदा सुरु असलेल्या, हुक्का पार्लर मध्ये, जोगेश्वरीच्या शंकरवाडी येथे राहणा-या मयुरची निर्घुण हत्या माहे ऑक्टोबर 2017 रोजीच्या सुमारास करण्यात येणे, या घटनेमुळे संपूर्ण गोरेगाव परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण होणे, गोरेगाव पोलिस ठाण्याच्या हद्दतील मोतीलाल नगर, लिंक रोड, एस. व्ही. रोड, जवाहर नगर मोजो ब्रिस्टो एन कॅफे, कसबा, इन्सोमानिया, केओस, रॉयल गार्डन, विनोदा बार, कांचा बार आदी ठिकाणी अनेक हुक्का पार्लर सार्वजनिक आरोग्य विभागाची परवानगी नसतानाही, पोलीसांच्या आशिर्वादाने | **गृह विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | बेकायदा सर्रास सुरु असणे, या ठिकाणी रात्रभर चालणा-या अनेक बेकायदेशीर हुक्का पार्लर व बारमुळे गुन्हेगारी कारवायामध्ये प्रचंड वाढ होऊन या परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्नक निर्माण होणे, वारंवार होणा-या गुन्हेगारी कारवायांच्या घटनामुळे स्थानिक जनता त्रस्त होणे, येथील अवैध हुक्का पार्लर व अन्य धंदे त्वरीत बंद करण्याच्या मागणीसाठी, लोकप्रतिनिधींनी पोलीस उपायुक्त व पोलीस ठाण्यास लेखी निवेदन देऊनही, अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याकडे झालेले व होत असलेले शासनाचे दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.'' | |
| **17.** | "नवी मुंबईतील जुईनगर परिसरातील बँक ऑफ बडोदावर दि.१३ नोव्हेंबर २०१७ रोजी वा त्यादरम्यान घालण्यात आलेला दरोडा, दरोडेखोरांनी बँके शेजारील रूम भाडेतत्वावर घेऊन अतिशय नियोजन पद्धतीने त्या गळ्यानमधून थेट बँकेपर्यंत भुयारी मार्ग खोदणे, बँकेतील २३६ लॉकर्स पैकी ३० लॉकर्स तोडून त्यातील सोने, चांदी असा कोट्यावधी रुपयांचा किंमती ऐवज लंपास करणे, नागरिक सुरक्षितेसाठी आपले सोने व इतर ऐवज बँकेतील लॉकर्समध्ये ठेवीत असणे, परंतु लॉकर्स तोडून त्यातील किंमती ऐवज दरोडेखोरांनी लंपास केला असल्याने किंमती ऐवज कूठे ठेवायचा असा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, दरोडेखोर भुयार खोदेपर्यंत पोलिसांना त्याचा सुगावा न लागणे, याबाबत सर्वच स्तरांमधून आचर्य व्यक्त होत असणे, या घटनेची संपूर्ण राज्यात उमटलेले प्रतिसाद, दरोडेखोरांना पकडण्याच्यादृष्टीने व असे प्रकार होऊ नये म्हणून पोलिसांकडून करण्यात आलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची भूमिका." | **गृह विभाग,** |
| **18.** | "औरंगाबाद येथील छावणी परिसरात दि.१२.११.२०१७ पासून दूषित पाणीपुरवठ्यामुळे गॅस्ट्रोचे २००० रुग्ण रुग्णालयात दाखल होणे, मनपा, आरोग्य विभाग, जिल्हा परिषदेच्या पथकाने पाहणी केल्यानंतर पंप हाऊस स्वच्छ असल्याचा शेरा | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण (सार्वजनिक आरोग्य) विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | दिला असतानाही दुषित पाणीपुरवठा होणे, त्यामुळे गॅस्ट्रोने नागरिक त्रस्त असणे, संडास, उलटी, मळमळ, पोटदुखी मुळे सामान्य रुग्णालयात रुग्णांची प्रचंड गर्दी असणे, ३० खाटांची व्यवस्था असलेल्या रुग्णालयात शेकडो रुग्ण भरती होणे, छावणी परिसराला रेल्वे भागातून ज्या ठिकाणाहून पाणीपुरवठा होतो ती जलवाहिनी ४० वर्षे जुनी असणे, भूमीगत जलवाहिनी असल्याने ती गंजलेली असणे, यामुळेही दुषित पाणीपुरवठा होत असल्याची शक्यता निर्माण होणे, शासनाने तातडीने ही पाईपलाईन दुरुस्त अथवा नवीन टाकण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना, यावर शासनाची प्रतिक्रिया." | |

| अ. क्र. | लक्षवेधी | विभागाचे नाव |
|---|---|---|
| **19.** | "मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाच्या (MMRDA) वतीने चालवण्यात येणाऱ्या मोनोरेल च्या डब्ब्यांना पहाटे अचानक आग लागल्यामुळे डब्बा संपूर्ण जाळून खाक झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास येणे, त्यामुळे सदरची आग लागल्यानंतर अद्याप पर्यंत मोनोरेल चालू झाली नसल्याचे निदर्शनास येणे, मोनोरेलच्या डब्ब्यांना व इंजिनाला वारंवार आग लागण्याचे प्रकार होत असल्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा निर्माण झालेला प्रश्न, डब्ब्यांना आग लागल्या नंतर अद्यापपर्यंत मोनोरेल चालू झाली नसल्याने मोनोरेल प्रशासनाकडे आपातकालीन विभाग कार्यरत नाही का याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | **नगरविकास विभाग** |
| **20.** | "देवनार, मुंबई येथील संजय गांधी नगर मधील रहिवाशी प्रदीप जाधवचा थंडी, ताप आल्याने झाकीर हुसेन नगर येथील, आलम क्लिनीकमध्ये दाखल केले असता शहबाज सिध्दिकी या बनावट डॉक्टरने, चुकीचे इंजेक्शन दिल्यामुळे त्याचा दिनांक 10 नोव्हेंबर, 2017 रोजी झालेला मृत्यू, सदरहू | **वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये (वैद्यकीय शिक्षण) विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | डॉक्टरने, आझमगढ येथील बीयूएमएस डॉक्टर असलेल्या भावाच्या पदवीचा गैरवापर करुन, देवनार मुंबई येथे गत तीन वर्षापासून अनधिकृत वैद्यकीय व्यवसाय करीत असणे, तसेच दिनांक 24 नोव्हेंबर, 2017 रोजी, टिळकनगर, नेहरुनगर, गोवंडी परिसरात, क्लिनीक मधून अनधिकृत आर्युवेदिक वैद्यकीय व्यवसाय करणा-या, तिघा बनावट डॉक्टरांच्या व्यवसायावर परिमंडळ-६ च्या पोलीस अधिका-यांनी केलेली कारवाई, यामुळे मानखुर्द, गोवंडी सह मुंबईतील अनेक भागात, बनावट डॉक्टर अनधिकृत वैद्यकीय व्यवसाय करीत असल्याने सर्वसामान्य नागरीकांच्या जिवीतास निर्माण झालेला धोका, मुंबईसह संपूर्ण राज्यात बनावट उपचार करणा-या डॉक्टरांचा शोध घेऊन त्यांचे विरुध्द कठोर कारवाई करण्याकरीता, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| **21.** | "पुणे जिल्हयातील निरा-भीमा नदीजोड प्रकल्पाच्या तावशी व डाळज या 24 किलोमीटर अंतराच्या सहा टप्प्यात शाफ्ट खोदून बोगद्याची खोदकाम सुरु असताना याठिकाणी जमिनीपासून सुमारे 100 फूटावर 300 कामगार खोदकाम करीत असताना दि. 20 नोव्हेंबर, 2017 रोजी क्रेन तुटल्याने 8 मजुरांचा झालेला मृत्यु, याबाबत ठेकेदारांकडून तसेच शासनाकडून कोणत्याही प्रकारची सुरक्षा न ठेवल्याने झालेला मोठा अपघात होऊनही मृतांच्या कुटुंबियांना ठेकेदार व शासनाकडून अद्यापी अर्थसाहय न मिळणे, त्यामुळे मृतांच्या नातेवाईक यांच्यामध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | **जलसंपदा विभाग** |

| अ. क्र. | लक्षवेधी | विभागाचे नाव |
|---|---|---|
| **22.** | "चंद्रपूर जिल्हयातील वेकोली माजरीच्या जुना कुनाडा खुल्या कोळसा खाणीत सूमारे अर्ध्या किमीचा मातीचा ढिगारा दिंनाक १ डिसेंबर, २०१७ रोजी कोसळल्याने सहा कामगार गंभीर जखमी होऊन तीन कामगारांची प्रकृती चिंताजनक | **उद्योग, उर्जा व कामगार (कामगार) विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | असणे, ढिगारा हळूहळू कोसळल्याने रात्रपाळीत काम करीत असलेले सुमारे ८० कामगार थोडक्यात बचावणे, या ढिगाऱ्याखाली आठ वोल्वो टिप्पर, दोन ड्रिल मशीन, चार पीसी मशीन दबलेली असणे, जुना कुनाडा खाणीचे ओव्हरबर्डन रिमुव्हलचा ठेका धनसार इंजिनियरिंग प्रायव्हेट लिमिटेडला दिलेला असणे परंतू या कंपनीने माईन प्लॅनचे उल्लघंन करून काम करीत असणे, या घटनेमूळे कामगामध्ये पसरलेले भितीचे वातावरण परिणामी कामगारांनी वेकोली आणि कपंनी अधिकाऱ्यांना घेराव घालून केलेले आंदोलन, चार दिवसापुर्वी या खाणीमधील वरच्या पहिल्या व दुसऱ्या बेंचला तडा गेल्या असल्याची माहिती वेकोली व घनसार कंपनीच्या प्रशासनाला देण्यात आलेली असतांनाही कामगारांना त्या ठिकाणी कामाला पाठविण्यात येणे, वेकोलीचे अधिकारी व घनसार कंपनीचे अधिकारी यांच्या संगनमतानेच कामगारांची पिळवणूक करण्यात येत असून त्यांच्या सुरक्षतेकडे कोणतीही उपाययोजना केलेली नसल्यामूळेच सदर घटना घडून कामगार जखमी होणे, यापुर्वी सुध्दा माजरी वेकोली क्षेत्रातील तेलवासा खुल्या कोळसा खाणीत दिंनाक २५ नोव्हेंबर, २०१७ रोजी ढिगारा कोसळून डोजर ऑपरेटरचा मृत्यू झाला असून अवघ्या सात दिवसातच ही दुसरी घटना घडल्याने कामगारात पसरत असलेले असंतोष याप्रकरणी वेकोली आणि खाजगी कपंन्याचे अधिकारी यांच्या विरोधात मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून उच्च स्तरिय चौकशी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | |
| **23.** | "राज्य शासनाच्या आठ विभागामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या शिष्यवृत्तीचा लाभ यंदयाच्या वर्षी 55 लाख विदयार्थ्यांपैकी एकालाही न मिळणे, विद्यार्थ्यांच्या थेट खात्यात रक्कम जमा करण्यासाठी महा डीबीटी पोर्टल सुरु करण्यात येऊनही एकाही पैशाची शिष्यवृत्ती अद्याप विदयार्थ्यांना मिळाली नसल्याचे माहे नोव्हेंबर, 2017 च्या दरम्यान उघडकीस येणे, राजकिय लाभ, आदिवासी विकास, इतर मागास वर्ग, अल्पसंख्याक, | **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य (सामाजिक न्याय) विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, कृषी, वैद्यकीय शिक्षण अशा आठ विभागांमार्फत जवळपास 55 लाख विद्यार्थ्याना शिष्यवृत्ती दिली जात असून, या शिष्यवृत्ती दरवर्ष माहे जुलैपासून लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होत असणे, परंतू या वर्षी माहे नोव्हेंबर उलटून गेला असूनही, शिष्यवृत्तीची रक्कम लाभार्थ्यांना मिळालेली नसल्याने लाखो विदयार्थ्यांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन शिष्यवृत्तीची रक्कम विदद्यार्थ्याच्या खात्यात त्वरीत जमा करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| **24.** | "विदेशातून तस्करी करून भारतात आणलेली सुपारी सल्फर डायऑक्साइडच्या भट्टीत भाजुन ती विकण्याचा अनधिकृत व्यवसायात नागपूरातमधील ७०० च्या वर व्यापारी गुंतले असल्याचे निदर्शनास येणे, संपूर्ण व्यापार कच्या स्वरूपात चालत असून, शासनाच्या मोठया प्रमाणात महसुल बुडत असून, अन्न व औषध प्रशासन विभागाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, नागपूर शहरातील तीन सुपारी भाजणाऱ्या कारखान्यातुन विषारी धुर सोडण्यात येऊन, निवासी घरांचा सुपारी व्यापाऱ्यांना गोदाम म्हणून वापरकरीत असून त्यास अग्नीशमन विभागी परवानगीही घेण्यात न येणे, सडलेली सुपारी सल्फर डायऑक्साईड च्या भट्टीत भाजल्याने अनेक नागरीकांना मुखाचा कर्करोग होण्याची शंका निर्माण होणे, मुख कर्करोगाचे सर्वाधिक रूग्ण नागपूर शहरामध्ये निदर्शनास आले असणे, शासनाने सदर प्रकरणी करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | **वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये (औषधी द्रव्ये) विभाग** |

| अ. क्र. | लक्षवेधी | विभागाचे नाव |
|---|---|---|
| **25.** | "राज्य शासनाने गुटखा उत्पादन आणि विक्रीवर बंदी आणली असतांनाही राज्यात गुटखा सहजरित्या उपलब्ध होत असल्याचे माहे नोव्हेंबर-2017 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, काही दिवसापुर्वी सांताक्रुझ, एस.व्ही. रोड, | **वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | रिझवी पार्क सोसायटीमधील दोन गाळ्यांमध्ये गुटख्याचा मोठा साठा सापडणे, गुटख्याची अवैध विक्री राज्यात पसरलेले असून अन्न व औषध प्रशासन व पोलीसांचे त्याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे शासनाची गुटखाबंदी केवळ कागदावरच असल्याचे स्पष्ट होणे, राज्यात गुटखा आणि पान मसाल्याचे उत्पादन, विक्री, साठवणूक आणि वाहतूकीवर कायद्याने बंदी घालण्यात येऊनही शहरात व गावांमध्ये आजही अनेक पान टप-यांवर लपूनछपून गुटखा विकला जात असल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, परिणामी राज्यात अवैधरित्या सुरु असलेल्या गुटखा विक्रीवर प्रतिबंद आणण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपययोजना." | |
| **26.** | "राज्यात पीसीपीएनडीटी कायदयाअंतर्गत 74 सोनोग्राफी केंद्रानी नोंदणीच केलेली नसल्याचे माहे डिसेंबर, 2017 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, देशामध्ये या कायदयाचे उल्लंघन करुन राजरोसपणे सोनोग्राफी केंद्रे सुरु ठेवण्याच्या एकूण 294 तक्रारीपैकी सर्वाधिक 74 तक्रारी महाराष्ट्रातील असणे, या बेकायदा सोनोग्राफी केंद्रावर गर्भलिंग निदान केले जाणे, बेकायदेशिर सुरू असलेल्या या सोनोग्राफी केंद्रामूळे अनेक महिलांचा मृत्य होणे, वंशाचा दिवा म्हणजे मुलगा हवा म्हणून मुलींना गर्भातच मारले जात असल्याचे प्रकार वारंवार घडत असंतानासुध्दा शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, डॉ.तुषार पाटील यांच्या सातपूर येथील एमएचबी कॉलनीमधील शकुंतला डायगोन्स्टीक सेंटर कडून इनोव्हा गाडीत अवैध सोनोग्राफी सुरु असल्याचे निदर्शनास येणे, या सेंटरची जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर तसेच ग्रामीण भागात वाहनातून अवैध गर्भलिंग निदान करण्याचे प्रकार सुरु असून त्यांच्याविरुध्द जिल्हा शासकीय रुग्णालयाचे जिल्हा चिकित्सक यांनी कोणतीच कारवाई न करणे त्यामूळे जनतेत पसरलेला असंतोष व शासनाने राज्यातील बेकायदा सोनोग्राफी केंद्रावर तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया." | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण (सार्वजनिक आरोग्य) विभाग** |
| **27.** | "रायगड जिल्हयातील शाळांना तांदूळ वगळता पोषण आहाराचे साहित्य किंवा त्यासाठी लागणारा निधी पुरविला | **ग्रामविकास व जलसंधारण** |

| | | |
|---|---|---|
| | नसल्याचे माहे नोव्हेंबर, 2017 मध्ये निदर्शनास येणे, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमधील शिक्षकांनी स्वत:च्या खिशातील तब्बल 2 कोटी 18 लाख रुपयांचा खर्च करुन पोषण आहार पुरविल्याचे उघडकीस येणे, गत पाच वर्षात निधीचा एक पैसाही न मिळाल्याने शिक्षकांवरच आर्थिक कुपोषणाची आलेली वेळ, रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत 1 लाख 09 हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून, या विद्यार्थ्यांना शासनाच्या पोषण आहार योजनेअंतर्गत शाळेत खिचडी देण्यात येणे, परंतु अनेकदा हे धान्य ठेकेदारामार्फत शाळांना वेळेवर पुरविले जात नसणे, चालु शैक्षणिक वर्षापासून आत्तापर्यंत म्हणजेच माहे जून ते माहे ऑक्टोबर अखेरपर्यंत रायगड जिल्हा परिषदेच्या एकाही शाळेला पोषण आहारामध्ये तांदूळ वगळता अन्य कोणत्याही बाबींचा पुरवठा करण्यात न येणे, भाज्या, कडधान्य खरेदीसाठी पैसे उपलब्ध न झाल्याने पाच महिन्यांत 2 कोटी 18 लाख रुपये इतका खर्चाची देयके शिक्षकांनी शासनास सादर करुनही त्याची अद्यापही प्रतिपुर्ती न होणे, आपल्या खिशातून करुन शासनाला तसेच स्थानिक पुरवठादारांना देयके वेळेवर मिळत नसल्याने त्यांनीही बंद केलेला पुरवठा, यामुळे संपूर्ण रायगड जिल्हयातील जिल्हा परिषदातील प्राथमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना खिचडी वेळेत मिळत नसल्याने विद्यार्थ्यांच्या व त्यांच्या पालकांच्या मनात निर्माण झालेला असंतोष याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | **(ग्रामविकास) विभाग** |
| **28.** | "महिलांमध्ये सध्या सर्व्हायकल कॅन्सर झपाट्याने पसरत असून. ११ ते २० वर्ष या वयोगटातील मुलींना शक्य तो सर्व्हायकल कॅन्सर होण्याची शक्यता असणे, सर्व्हायकल कॅन्सरला प्रतिबंध करण्यासाठी लस उपलब्ध असून, वरील वयोगटातील मुलींना काही ठराविक अंतराने ३ लसी दिल्यास या आजारावर प्रतिबंध होऊ शकतो, परंतु एका लसीची किंमत रुपये ३ हजार असून ३ लसी घेण्यासाठी ९ हजार रुपये खर्च करावा लागत असल्यामुळे सर्वसामान्य, गरीब कुटुंबांना हा खर्च परवडणारा नसणे. सर्व्हायकल कॅन्सरमुळे दरवर्षी | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण (सार्वजनिक आरोग्य) विभाग** |

| | | |
|---|---|---|
| | सरासरी २ लाख ६५ हजार, ६७२ महिलांचा होत असलेला मृत्यू या सर्व्हायकल कॅन्सरसाठी Gardasil आणि Cervarix या दोन लसी बनविण्याऱ्या Glax Smith आणि Merck या कंपन्यानी राज्य शासनाच्या सर्व सवलती घेणे, यापूर्वी मुंबईसह राज्यामध्ये हॅपेटाटस बी या रोगावर प्रतिबंद आणण्यासाठी सवलतीच्या दरात लसी उपलब्ध करून देण्यात येणे. राज्य शासनाने राज्यातील विविध ठिकाणी जनतेच्या आरोग्यासाठी महापालिका, नगरपरिषदा, जिल्हापरिषदा व वेगवेगळ्या समाजिक संस्था यांच्या माध्यमातून आरोग्य शिबिराचे आयोजन केले जात असणे, मा. पंतप्रधान यांच्या बेटी बचाव बेटी पढाव या योजनेअंतर्गत राज्यभर महिलांमध्ये सर्व्हायकल कॅन्सरबाबत जनजागृती करून, सर्व्हायकल कॅन्सरची लस सवलतीच्या दरात महिलांना उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| **29.** | "नशा आणण्यासाठी ताडीमध्ये घातक केमिकलचा वापर करुन ताडी विक्री करणाऱ्या सातारा, पुणे, भिवंडी, कल्याण, अंबरनाथ, कांदिवली, मिरा-भाईंदर इत्यादी शहरात ठिकठिकाणी धाडी टाकून ९ व्यक्तींना माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१७ मध्ये उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेली अटक, यासंदर्भामधील २ आरोपी अद्यापही फरार असणे, सदरहू धाडीत ३० लाखापेक्षा जास्त माल जप्त करण्यात येणे, दिवसेंदिवस विषारी ताडी विक्रीचे प्रमाण राज्यात मोठ्या प्रमाणात आढळून येणे, विषारी ताडीमुळे निरपराध नागरिकांचे आयुष्य व आरोग्य धोक्यात येणे, अटक करण्यात आलेल्या व्यक्तिवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच घातक केमिकलचा वापर करुन ताडी विक्री करण्याचा धंदा रोखण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | **गृह विभाग** |